नि.फौ.ख.क्र.५३५/२०१३
शामराव विरुध्द गणेश
नि.क्र.९० खाली

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ ची पुढील उलटतपासणी शपथेवर सुरु.**

आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.आर.एच.भोसले

हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व मी एकाच माळी समाजाचे आहोत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी हे सन २०१०-११ मध्ये रहायला पुणे येथे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी हे त्यांच्या शैक्षणीक संस्थेच्या कामाकरीता पुण्यालाच कायमस्वरुपी वास्तव्यास होते. साक्षीदार स्वतःहू सांगतो की, फिर्यादी हे पुणे तसेच वाई या दोन्ही ठिकाणी वास्तव्यास होते. सन २०११ मध्ये मी वाई येथील किसनविर महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत होतो. आमचे कॉलेज त्यावेळी सकाळी ८.०० ते दुपारी १२.०० पर्यंत असायचे. हे म्हणणे खरे आहे की, मी प्राध्यापक म्हणून कार्यरत असताना शेती सुध्दा करायचो व त्यातील उत्पन्नातुन काही स्थावर मिळकती मी खरेदी केल्या आहेत. त्यात फलॅटचा देखील समावेश आहे.

प्रकरण उर्वरीत उलटतपासाकरीता तहकूब.

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.11.05 17:05:52 +0530

दि.०४.११.२०२५

(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, वाई.